सोमवार, दि. ८ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# प्रशासनाच्या मध्यस्थीनंतर विसर्जनाचा मार्ग मोकळा; ‘न भुतो न भविष्यति’ उत्साहात बाप्पांना निरोप





## शहरात तब्बल १२ तास चालली विसर्जन मिरवणूक; मोती तलावाच्या नव्या कुंडात भव्य विसर्जन सोहळा

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील गणेश विसर्जनाचा सोहळा यंदा प्रचंड गदारोळात पार पडला. एका व्हायरल व्हिडिओमुळे निर्माण झालेल्या तणावाने आणि हिंदुत्तवादी संघटनांच्या आवाहनामुळे विसर्जन थांबण्याच्या मार्गावर आले होते. मात्र, पोलिस प्रशासन व महानगरपालिका यांच्या संयुक्त मध्यस्थीमुळे सर्व अडथळे दूर झाले आणि शनिवारी (दि. ६) संध्याकाळी गणेश विसर्जनाला सुरुवात झाली. या ऐतिहासिक मिरवणुकीला जालनेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत न भुतो न भविष्यती असा सहभाग नोंदवला.

शहरातील एका व्हिडिओमुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्याने हिंदुत्तवादी संघटनांनी कडक भूमिका घेतली होती. आरोपींना अटक झाल्याशिवाय विसर्जन होणार नाही असे जाहीर करण्यात आले होते. परिणामी जवळपास १०० टक्के मंडळांनी विसर्जन पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. शहरात वातावरण तणावपूर्ण झाले होते. पण प्रशासनाने तातडीने मध्यस्थी करत हिंदुत्तवादी संघटनांशी चर्चा केली. महानगर पालिका व पोलीस प्रशासनाने तातडीने लेखी आश्वासन दिले. आणि मंडळांना विसर्जन करण्याचे आवाहन केले.

श्री गणेश महासंघाच्यावतीने यंदाच्या विसर्जन मिरवणुकीसाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. ‘सर्जिकल स्ट्राईक’चा देखावा उभारण्यात आला होता, ज्यामुळे मिरवणूक अधिक आकर्षक ठरली. सहभागी होणाऱ्या प्रत्येक मंडळाचे येथे स्वागत केले जात होते. त्यामुळे वातावरणात उत्साह आणि ऐक्याचा संदेश पसरला.

शनिवारी सायंकाळी सातच्या सुमारास शहरातील मानाचा गणपती जनार्धन मामा चौकात दाखल झाला. याच ठिकाणाहून भव्य मिरवणुकीला सुरुवात झाली. ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक वेषभूषेत सजलेल्या तरुण-तरुणींच्या उत्साहात वातावरण भारावून गेले होते. विविध कलात्मक देखावे, सजीव झांकी आणि पारंपारिक नृत्य यामुळे मिरवणूक थाटात रंगली.

मिरवणुकीचा उत्साह एवढा प्रचंड होता की तो दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी (दि. ७) सकाळपर्यंतही ओसरला नाही. तब्बल बारा तासांपेक्षा अधिक काळ शहरातील प्रमुख रस्त्यांवरून मार्गक्रमण करत अखेर मिरवणूक मोती तलावाकडे पोहोचली. रात्री उशिरा नव्याने बांधलेल्या १९ कोटी रुपयांच्या खर्चातून उभारलेल्या आकर्षक कुंडात विसर्जनास सुरुवात झाली.

यंदा शहरातील सर्वांचे लक्ष वेधून घेणारी राधाकृष्ण मूर्ती विशेष आकर्षण ठरली. रविवारी दुपारी चारच्या सुमारास या मूर्तीचे विसर्जन पार पडले. भक्तांनी या क्षणाला उपस्थित राहण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

महानगरपालिकेने यंदा विसर्जनासाठी मोठी तयारी केली होती. गणेश मंडळांना आणि भक्तांना आवश्यक ते सर्व सहकार्य देण्यात आले. याशिवाय पोलिसांनीही मोठा बंदोबस्त ठेवला होता. तणावपूर्ण परिस्थिती असूनही मिरवणूक सुरळीत पार पडली. कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. विसर्जनानंतर पोलिस प्रशासनाने गणेश भक्तांचे आभार मानत शिस्तबद्ध व शांततेने उत्सव साजरा केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

प्रारंभीच्या तणावानंतर अखेर गणेश विसर्जनाचा सोहळा शांततेत व उत्साहात पार पडला. ढोल-ताशांच्या गजरात, पारंपारिक संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या देखाव्यांसह, भक्तांच्या प्रचंड सहभागामुळे जालन्यातील विसर्जन मिरवणूक न भुतो न भविष्यती ठरली. या मिरवणुकीने गणेशोत्सवाच्या शेवटास एकात्मता, उत्साह आणि सामूहिक भावनांचा सुंदर संदेश दिला.













(सर्व छायाचित्रे - किरण खानापुरे / अतुल व्यवहारे)

# संपादकीय पान

## मेलडीक्वीन आशाताई

गेली सात दशके आपल्या स्वरांनी चाहत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि असंख्य संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणाऱ्या जेष्ठ अष्टपैलू गायिका, मेलडी क्वीन आशा भोसले यांचा आज वाढदिवस. आशाताईंचा आज ९२ वा वाढदिवस आहे असे सांगितले तर कोणाचा विश्वासही बसणार नाही. कारण आपल्या आवाजाप्रमाणे कायम चिरतरुण असणाऱ्या आशाताईंमध्ये आजही वीस वर्षाच्या तरुणीला मागे पाडेल एवढी ऊर्जा आहे. वयाच्या ९२ व्या वर्षीही त्यांच्यात गाण्याची, स्वर उंचावण्याची क्षमता एवढी आहे की आजही त्यांच्या आसपास कोणतीही गायिका फिरू शकत नाही. आपल्या सात दशकांच्या संगीत कारकिर्दीत त्यांना भारतरत्न सोडता सर्वच पुरस्कार मिळाले. दोन वर्षापूर्वी २४ मार्च २०२३ रोजी आशाताईंना प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने महाराष्ट्र सरकारतर्फे गौरविण्यात आल्याने संगीत प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला होता. यावेळी तेव्हाचे उपमुख्यमंत्री व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर तसेच भारतरत्न सचिन तेंडुलकर उपस्थित होते. आशा भोसले यांचे संगीत क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. आशा भोसले यांनी गेली सत्तर वर्ष संगीत कलेची जी सेवा केली आहे त्याचीच पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार. ८ सप्टेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या आशाताईंना संगीताचे बाळकडू त्यांच्या घरातच मिळाले. १९४३ साली माझा बाळ या चित्रपटात दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या चला चला नव बाळा... या गाण्याने आशाताईंनी चित्रपट गायनाला प्रारंभ केला. वयाच्या पंधराव्या वर्षीच म्हणजे १९४८ साली हंसराज बहल यांच्या चुनरिया या चित्रपटात सावन आया हे गाणे गाऊन त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. १९५३ साली बिमल रॉय यांनी त्यांना आपल्या परिणिता या चित्रपटातील गाणी गाण्याची संधी दिली. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५४ साली राज कपूर यांनी बूट पॉलिश या चित्रपटात मोहम्मद रफी यांच्यासोबत नन्हे मुन्ने बच्चे तेरे मुठ्ठी मे क्या है गायला दिले. १९५६ साली सीआयडी हा चित्रपट आला या चित्रपटातील त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. १९५७ साली आलेल्या नया दौर या चित्रपटातील गाणी तर खूपच लोकप्रिय झाली आणि सर्वत्र आशाताईंचे नाव झाले. आशाताई हिंदी चित्रपट सृष्टीतील आघाडीची गायिका म्हणून नावारूपास आल्या. त्या काळातील सर्वच संगीतकारांची गाणी त्यांनी गायली. मागील सत्तर वर्षात असा एकही संगीतकार नसेल ज्यांनी आशाताईंना आपल्यासाठी गाण्याची विनंती केली नसेल. १९४८ पासून सुरू झालेला आशाताईंच्या संगीत कलेचा प्रवास आजही अखंडपणे सुरू आहे. आशा भोसले यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तामिळ, मल्याळम, इंग्रजी, रशियन अशा विविध भाषेत सोळा हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. त्यांनी एक हजारांहून अधिक चित्रपटासाठी गायन केले. हिंदी चित्रपटसृष्टीतील गायनासाठी त्यांना सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार तर दोनवेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. २000 साली त्यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्काराने तर २00८ साली मानाच्या पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. २०११ साली सर्वाधिक गाणी गाण्याचा विश्वविक्रम त्यांनी केला. त्यांच्या या विश्वविक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. आशा भोसले यांनी सर्वप्रकारची गाणी गायली आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीवर सुरवातीच्या काळात लता मंगेशकर यांचा वरचष्मा होता. तेंव्हा दुसऱ्या गायिकांना संधी मिळणे अवघड होते हे ओळखून त्यांनी वेगळा मार्ग पत्करला. ज्या प्रकारची गाणी लता मंगेशकर गायच्या त्या प्रकारची गाणी सोडून अन्य प्रकारची गाणी त्यांनी गायला सुरुवात केली. यात पॉप तसेच पाश्चिमात्य सुरावट असलेल्या गाण्यांचा समावेश होता. त्या गाण्यांनी युवकांवर मोहिनी घातली. त्यांनी गायलेले गझल, मुजरे आणि भजनेही लोकप्रिय झाली. संगीतातला कुठलाही प्रकार त्यांनी गायचा सोडला नाही. आशा भोसले यांनी अनेक भाषेत गाणी गायली असली तरी त्यांनी मराठीत सर्वाधिक गाणी गायली आहेत ते स्वाभाविकही आहे त्यांचे बंधू हृदयनाथ मंगेशकर यांच्यासाठी त्यांनी अनेक गाणी गायली आहेत. मलमली तारुण्य माझे, तरुण आहे रात्र अजूनी, मी मज हरपून बसले ग ही त्यांची गाणी इतकी लोकप्रिय आहेत की अजूनही ती स्मरणात आहे. कुठल्याही कार्यक्रमात ही गाणी अजूनही म्हटली जातात. त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली आहेत. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या आशाताई म्हणजे आधुनिक काळातील एक आश्चर्य आहे. आशाताईंना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## विजय राठोड यांची स्वराज्य शिक्षक संघटनेच्या जालना जिल्हाध्यक्षपदी निवड

**मंठा । प्रतिनिधी -** शिक्षक दिनाचे औचित्य साधत स्वराज्य शिक्षक संघटनेच्या जालना जिल्हाध्यक्षपदी विजय सतनाम राठोड यांची निवड करण्यात आली. विनाअनुदानित शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा देणारे व संघटनेची सर्व कामे तत्परतेने पार पाडणारे म्हणून राठोड यांची ओळख आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत सर्वसंमतीने त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच स्वराज्य शिक्षक संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही निवड पार पडली. राठोड यांनी विनाअनुदानित शिक्षकांच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष केला आहे. आझाद मैदानावरील आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग होता. सहकाऱ्यांना एकत्र करून संघटितपणे लढण्याची त्यांची वृत्ती आहे. यामुळेच शिक्षकांमध्ये ते नेहमी आवाज उठवणारे आणि न्याय मिळवून देणारे नेतृत्व म्हणून प्रसिद्ध आहेत. राठोड यांच्या या निवडीबद्दल ज्ञानेश चव्हाण, ज्ञानेश्वर शेळके, शंकर शेरे, गिरीश मखमले, दत्तात्रय चव्हाण, विजय सुराशे, जहीर काझी, गणेश सुराशे, गैबिनाथ वायळ आदी पदाधिकारी तसेच शिक्षक वर्गातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# होय, 'कायदेशीर' भ्रष्टाचार!

पैसे खाणे, भ्रष्टाचार करणे हे एके काळी बेकायदेशीर होते पण आता ते तसे राहिलेले नाही. कायदेशीररित्या देखील पैसे खाता येतात, भ्रष्टाचार करता येतो. आज बेकायदेशीररित्या जेवढा पैसा खाल्ला जात असेल त्या पेक्षा जास्त पैसा कायदेशीर रित्या खाल्ला जातो. बेकायदा पैसे खाणारे खालच्या स्तराचे व कायदेशीर पैसा खाणारे वरच्या स्तराचे मानले जातात.

आपल्या कायदा-व्यवस्थेतच एक मोठा घोळ आहे. आपली कायदेव्यवस्था 'प्रक्रिया' पाहते. 'न्याय्यता' पहात नाही. ठरवून दिलेल्या प्रक्रियेनुसार झाले असेल तर ते योग्य आणि कायदेशीर मानले जाते. म्हणून सगळे गैरव्यवहार चौकटीत बसवले जातात. किंबहुना पैसे खाता यावेत अशा चौकटी बनवल्या जातात. चौकटी बनवण्याचे काम राज्यकर्ते करतात व चौकटीत बसवण्याचे काम सरकारी अधिकारी करतात. म्हणूनच आमच्या देशात सरकारी नोकर आणि सत्ताधारी पुढारी यांची मिलीभगत आहे. त्या शिवाय आमच्या देशात असे कितीतरी व्यायासाय चालतात जे 'निर्धारित प्रक्रियेत' बसवून देण्याचे काम करतात. उदाहरणार्थ अनेक वकील, अनेक चार्टर्ड अकाउंटंट, अनेक एम डी, कारकून पदावरचे लोकही हेच करून देत असतात.

न्यायापेक्षा चौकटीला जास्त महत्व दिल्यामुळे सगळीच व्यवस्था भ्रष्ट झालेली दिसते. जो तो चौकटीत बसवून कसा खिसा भरता येईल यासाठीच धडपडतो. जे घटक, जे व्यवसाय अशा पद्धतीत बसत नाहीत, ते मागे राहतात. शेती व्यवसाय त्या पैकी एक आहे. सरकारने 'ठरवून दिलेल्या कायदेशीर प्रक्रिये नुसार' शेतीचे उत्पादन करता येत नाही. ती नैसर्गिक प्रक्रिया आहे. म्हणून म्हणतात की शेती करताना भ्रष्टाचार करता येत नाही. शेती व्यवसायात चोरीची संधी नसल्यामुळे सतत हा व्यवसाय मार खात राहिला आहे.

शेतीची कायदेशीर लूट करता यावी म्हणून १) कमाल शेतजमीन धारणा कायदा, २) आवश्यक वस्तू कायदा, ३) जमीन अधिग्रहण कायदा असे कायदे बनविण्यात आले. या कायद्यानी चौकट तयार केली. लुटीला कायदेशीर स्वरूप दिले. मान्यता दिली.

आता पहाना, हे कायदे परिशिष्ट ९ मध्ये टाकून दिले. कायदा असा केला की, परिशिष्ट ९ मध्ये टाकलेल्या कायद्यांच्या विरुद्ध कोर्टात चॅलेंज करता येणार नाही. तोंड दाबून बुक्यांचा मार! कायदाच बेकायदेशीर तयार करायचा. हे सगळे 'ड्यु प्रोसेस' ची अपत्ये आहेत. आज बेकायदेशीर भ्रष्टाचाराचा मुद्दा तेवढा गंभीर नाही, जेवढा कायदेशीर भ्रष्टाचाराचा आहे.

कायदेशीर भ्रष्टाचार म्हणजे तिजोरीवर डल्ला मारले. सरकारी तिजोरीवर बिनबोभाट दरोडा घालणे. या दरोड्याला कायदेशीर प्रक्रियेत बसवण्यासाठी विविध प्रकारच्या योजना आणल्या जातात. विकास योजनामुळे कधी लोकांचे भले झाले आहे का? मालाचे पुरवठादार, गुत्तेदार, सरकारी नोकर, पुढारी हेच मालामाल झालेले आपण पाहिले आहेत. तिजोरीवर डल्ला मारायचा असेल तर त्यासाठी तिजोरी भरलेली असली पाहिजे. तिजोरी भरलेली रहावी यासाठी तशी कर पद्धती ठरवली जाते. जी एस टी आणि आयकर हे काम करतात. अशा करप्रणाली मुळे तिजोरी शिगोशिग भरलेली राहते.

कायदेशीर भ्रष्ट्याचाराचा सर्वात वाईट परिणाम सामान्य नागरिकांवर पडतो. पापभिरू माणसे भरडली जातात. सर्जक चिरडले जातात. देशाच्या कायदे व्यवस्थेतून 'ड्यू प्रोसेस' हद्दपार होत नाही तोपर्यंत ही घाण साचत राहणार आहे.

**अमर हबीब, आंबाजोगाई**
**किसानपुत्र आंदोलन**
**मो. ८४११९०९९०९**

# अत्याधुनिक युगात १०० टक्के साक्षर होणे गरजेचे

१९६५ मध्ये ८ ते १९ सप्टेंबर दरम्यान इराणची राजधानी तेहरान येथे जगभरातील शिक्षणमंत्र्यांची एक बैठक झाली. यानंतर १९६६ साली संयुक्त राष्ट्रसंघाने शिक्षणप्रणालीमध्ये जागरूकता वाढावी याउद्देशाने ८ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तेव्हापासुन जगभरात ८ सप्टेंबरला दरवर्षी साक्षरता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.म्हणजेच देशाची प्रगती असो वा स्वतःची प्रगती असो शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असते.हाच उद्देश साक्षरतेचा आहे.कारण यातुनच आयुष्याची जडणघडण निर्माण होते व मन्युष्य घडतो.आज अनेक देश प्रगतीपथावर आहेत.परंतु आफ्रिका आणि आशिया खंडात साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे अशिक्षितपणा, बेरोजगारी,भुकमरी, कुपोषण व जंगली जीवन आहे.आजही भारतसुध्दा पुर्णपणे साक्षर नाही.याकरीता सरकारला मोठे अभियान चालविण्याची गरज आहे.भारत सध्याच्या परिस्थितीत फक्त ६0 टक्के साक्षर आहे.देशात साक्षरतेच्या अभावामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यां होत आहे. त्या थांबविण्याचा संकल्प ८ सप्टेंबरला घेऊन साक्षरता अभियान युध्दपातळीवर व्हायला पाहिजे.कारण बदलत्या काळानुसार १00 टक्के साक्षर होणे गरजेचे आहे.भारतातील केरळ हे असे एकमेव राज्य आहे की ते १00 टक्के साक्षर आहे.आजच्या परिस्थितीत ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे तो देश मागासलेल्या देशाच्या रांगेत येतो. भारतातील आदीवासी भाग व अती दुर्गम भाग अजून पर्यंत साक्षर नाहीत. त्यामुळे त्यांना अनेक कठीण प्रसंगांचा सामना करावा लागतो.साक्षरतेच्या अभावामुळे देशातील अनेक दुर्गम भागातील राज्यात नक्षलवादाचा किंवा गुन्हेगारांचा जन्म होतो.अती दुर्गम भागात पोषक आहाराची व योग्य शिक्षणाची गरज आहे अन्यथा येथुनच कुपोषण,भुकमरी, वाममार्ग व आत्महत्येचा उदय होत असतो.भारतातील वाढती लोकसंख्या ही साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेली मोठी समस्या आहे.भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे धर्मा-धर्मात कटुता निर्माण होते आणि धर्माच्या नावावर लोकसंख्या वाढवीण्याची शर्यत लागते. यामुळेच भारताला लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. भारतातील वाढती लोकसंख्या नियंत्रीत ठेवण्यासाठी भारताने साक्षरता अभियान युध्दपातळीवर राबवायला हवे.जगातील अनेक देश प्रगतीपथावर आहेत. आज प्रत्येक देशाजवळ मोठ्या प्रमाणात दारुगोळा आणि अत्याधुनिक शस्त्रसामग्रीचा साठा आहे.परंतु जर तो देश साक्षर नसेल तर काय फायदा असे देश मागासल्यामध्ये गणल्या जातात.आज पाकिस्तान फक्त २0 टक्के साक्षर आहे.त्यामुळे तो गेल्या ७८ वर्षाच्या काळात तो कवडीचीही प्रगती करू शकला नाही. पाकिस्तानने फक्त आतंकवाद्यांना खतपाणी घालण्याचे काम केले व आताही करीत आहे व याचा परिणाम आज संपूर्ण पाकिस्तान रक्ताच्या लाथोळ्यात लथफतलेला दिसून येतो.त्यामुळेच आज पाकिस्तानाच्या हातात भिकेचे ढोबर दिसून येते व आजच्या परिस्थितीत पाकिस्तान जगातील आतंकवाद्यांचे माहेरघर बनले आहे. जगातील प्रत्येक देशांनी ८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी साक्षरता अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे देश प्रगतीपथावर येईल.आजच्या यांत्रिकी युगात युवावर्ग मोबाईलमध्ये गर्क असतो. त्यामुळे नवीन नवीन अनेक व्याधी निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.याकरिता साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून मोबाईल पासून होणाऱ्या नुकसानाबद्दल सूध्दा जागृती करणे आज गरजेचे आहे.आज स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे.देशाच्या सार्वजनिक आरोग्य संस्थेच्या मते स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करत असल्याने लहान मुलांना डिजिटल मीडिया आणि टेलिव्हिजनपासुन पूर्णपणे दूर ठेवले पाहिजे.हा संपूर्ण परीणाम साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येते.साक्षरता म्हणजे फक्त शिक्षण नसुन आपुलकी,खान-पाण, रहाणीमान,देशाचा विकास, पारिवारिक सुख-दुःख, सुविधा, परिपक्वता,संस्कृती, आरोग्याची काळजी, सोशल मिडियापासुन लहान मुलांवर होणारे दुष्परिणाम ह्या संपूर्णबाबी साक्षरतेमध्ये मोडत असतात. आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे.त्यामुळे पृथ्वी नष्ट व्हायला काहीच वेळ लागणार नाही. आज जगात महाप्रलय, भुकंप, सुनामी, अतिउष्णता, अतिथंडी, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण विनाशकारी घटना मानवाने स्वतःहून ओढवल्या आहेत. जगात सध्याच्या परिस्थितीत जंगल तोड मोठ्या प्रमाणात सुरू आहे यामुळे पृथ्वीतलावरील सर्वांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे दिसून येते. ह्या सुध्दा साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेल्या समस्या आहेत. आंतराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात साक्षरता अभियान छेडुन मानवजाती, जिवजंतु, पर्यावरण व निसर्ग यांना वाचविले पाहिजे. कारण मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे तो स्वतःच्या स्वार्थासाठी कोणत्याही स्तरावर जात असतो अशा परिस्थितीत तो मागचा-पुढचा कुठलाही विचार करीत नाही व याचा दुष्परिणाम संपूर्ण मानवजातीला व जीवसृष्टीला भोगावा लागतो. ह्या संपूर्ण बाबी साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येतो.त्यामुळे साक्षरतेमध्ये सर्वच स्तरातून विचार व्हायला हवा.म्याझॉनसारखे जंगल जळने,वनवे लागले, महाप्रलय येणे हे सर्व साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे असे मला वाटते. निसर्गाचे वाटोळे मानवाने केले, जंगल संपदा मानवाने नष्ट केली, नवीन-नवीन समस्या मानवाने निर्माण केल्या यामुळेच आज पृथ्वी भयभीत आहे.मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी पृथ्वीच्या पोटातील संपूर्ण पाणी निचोड्डुन टाकले यामुळेच आज अनेक देश पीण्याच्या पाण्यासाठी रेडझोनमध्ये आल्याचे दिसून येते.याला साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून वाचविले पाहिजे.याकरिता जगातील प्रत्येक देशांना युध्दपातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.आज प्रत्येक देश युद्धासाठी सज्ज आहे त्यापध्दतीने प्रत्येक देशांनी आपली तयारी केली आहे.म्हणजे जग आज तिसऱ्या महायुध्दाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहे.याला साक्षरता अभियानाच्या माध्यमातून थांबविले पाहिजे. जगातील प्रत्येक देशांनी प्रगती अवश्य करावी.परंतु मानवजातीच्या कल्याणासाठी व जे निसर्गाच्या सानिध्यात रहातात (पशुपक्षी,वण्यप्राणी)त्यांच्यावर कोणताही प्रकारचा अन्याय होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे. यातच आपल्या खरा आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस दिसून येईल. चारित्र्य बनविण्यासाठी, चांगलेव्यक्तीत्व निर्माण करण्यासाठी जो कोणी प्रयत्न करेल तोच खरा साक्षरतेचा भागीदार आहे.८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसाचे औचित्य साधून जगभरातील प्रत्येक देशांनी साक्षरता अभियानासोबत बदलत्या हवामानावर मात करण्यासाठी वृक्षलागवड अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# पितृपक्ष आणि श्राद्धविधी करण्याचे महत्त्व

हिंदु धर्मांने सांगितलेल्या ईश्वरप्राप्तीच्या मूलभूत सिद्धांतांपैकी एक म्हणजे 'देवऋण, ऋषीऋण, पितृऋण आणि समाजऋण ही चार ऋणे फेडणे' होय. यांपैकी पितृऋण फेडण्यासाठी पितरांसाठी श्राद्धविधी करणे आवश्यक असते. माता-पिता तसेच निकटवर्तीय यांचा मृत्यूनंतरचा प्रवास हा सुखमय आणि क्लेशरहित व्हावा, त्यांना सद्गती मिळावी, यांसाठीचा संस्कार म्हणजेच 'श्राद्ध.' यावर्षी ८ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर या कालावधीत पितृपक्ष आहे. प्रतिवर्षी पितृपक्षातील कृष्णपक्षात महालय श्राद्ध केले जाते. श्राद्धविधी हा हिंदु धर्मातील एक महत्त्वाचा आचार असून त्याला वेदकाळाचाही आधार आहे. अवतारांनीही श्राद्धविधी केल्याचा उल्लेख आढळतो. श्राद्धातील मंत्रोच्चारांमध्ये पितरांना गती देण्याची सूक्ष्म-शक्ती सामावलेली असते. श्राद्धाचे इतके महत्त्व असतांनाही आज हिंदूंमधील धर्मशिक्षणाचा अभाव, त्यांचा अध्यात्मावरील अविश्वास, त्यांच्या विचारसरणीवर पाश्चात्त्य संस्कृतीच्या अंधानुकरणाची चढलेली पुटे आदींमुळे श्राद्धविधी दुर्लक्षिला वा अवास्तव अवाजवी कर्मकांडात गणला जाऊ लागला आहे. म्हणूनच अन्य संस्कारांइतकाच 'श्राद्ध' हा संस्कारही अत्यावश्यक कसा आहे, हे सांगणे क्रमप्राप्त ठरते. श्राद्ध म्हणजे काय आणि त्याविषयीचा इतिहास, पितृपक्षात श्राद्ध आणि दत्ताचा नामजप करण्याचे महत्त्व, श्राद्धविधी करण्यामागील उद्देश, श्राद्ध कोणी करावे ?, श्राद्ध करण्यात अडचणी आल्यास त्या दूर करण्याचे मार्ग आदीविषयीचे शास्त्र सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या लेखातून जाणून घेऊया.

श्राद्ध शब्दाची व्युत्पत्ती आणि अर्थ : 'श्रद्धा' या शब्दापासून 'श्राद्ध' हा शब्द निर्माण झाला आहे. इहलोक सोडून गेलेल्या आपल्या वाडवडिलांनी आपल्यासाठी जे काही केले, त्याची परतफेड करणे अशक्य असते. त्यांच्यासाठी जे पूर्ण श्रद्धेने केले जाते, ते 'श्राद्ध' होय.

श्राद्ध शब्दाची व्याख्या : ब्रह्मपुराणाच्या 'श्राद्ध' या प्रकरणात श्राद्धाची पुढील व्याख्या दिली आहे.

देश काले च पात्रे च श्रद्धया विधिना च यत् ।
पितनुद्दिश्य विप्रेभ्यो दत्तं श्राद्धमुदाहृतम् ।।

अर्थ : देश, काल आणि पात्र (योग्य स्थळ) यांना अनुलक्षून श्रद्धा आणि विधी यांनी युक्त असे पितरांना उद्देशून ब्राह्मणांना जे (अन्नादी) दिले जाते, त्याला श्राद्ध म्हणावे.

श्राद्धविधीचा इतिहास : 'श्राद्धविधीची मूळ कल्पना ब्रह्मदेवाचा पुत्र अत्रिऋषी यांची आहे. अत्रिऋषींनी त्यांच्या वंशातील निमीला ब्रह्मदेवाने घालून दिलेला श्राद्धविधी सांगितला. तो रूढ आचार आजही चालू आहे. मनूने प्रथम श्राद्धक्रिया केली; म्हणून मनूला श्राद्धदेव म्हणतात. लक्ष्मण आणि जानकी यांसह राम वनवासासाठी गेल्यानंतर भरत त्यांची वनवासात भेट घेतो अन् त्यांना पित्याच्या निधनाची वार्ता सांगतो. त्यानंतर 'राम यथाकाली वडिलांचे श्राद्ध करतो', असा उल्लेख रामायणात आहे. ऋग्वेदकाली समिधा आणि पिंड यांची अग्नीत आहुती देऊन केलेली पितृपूजा म्हणजे अग्नौकरण, पिंडांची तिळांनी शास्त्रोक्त केलेली पूजा म्हणजे पिंडदान (पिंडपूजा) आणि ब्राह्मणभोजन या इतिहासक्रमाने रूढ झालेल्या श्राद्धाच्या तीन अवस्था आहेत. सांप्रत काळातील 'पार्वण' श्राद्धात या तीनही अवस्था एकत्रित झाल्या आहेत. धर्मशास्त्रात हे श्राद्ध गृहस्थाश्रमी लोकांना कर्तव्य म्हणून सांगितले आहे.

श्राद्ध करण्याचे उद्देश :

पितृलोक प्राप्त झालेल्या पितरांना पुढच्या लोकांत जाण्यासाठी गती मिळावी, यासाठी श्राद्धविधींद्वारे त्यांना साहाय्य करणे.

आपल्या कुळातील ज्या मृत व्यक्तींना त्यांच्या अतृप्त वासनांमुळे सद्गती प्राप्त झाली नसेल, म्हणजेच ते उच्च लोकात न जाता नीच लोकात अडकून पडले असतील, त्यांच्या इच्छा-आकांक्षा श्राद्धविधींद्वारे पूर्ण करून त्यांना पुढची गती प्राप्त करून देणे.

पितृपक्षात श्राद्ध करण्याचे महत्त्व आणि पद्धत : पितृपक्ष हे हिंदु धर्मात सांगितलेले व्रत असून भाद्रपद प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत प्रतिदिन महालय श्राद्ध करावे, असे शास्त्रवचन आहे. पितरांसाठी श्राद्ध न केल्यास त्यांच्या इच्छा अतृप्त राहिल्यामुळे कुटुंबियांना त्रास होण्याची शक्यता असते. श्राद्धामुळे पितरांचे रक्षण होते, त्यांना गती मिळते आणि आपले जीवनही सुसह्य होते. पितृपक्षात एक दिवस पितरांचे श्राद्ध केले असता, ते वर्षभर तृप्त रहातात.

पितृपक्षातही श्राद्ध करणे शक्य नसल्यास ज्या तिथीला आपला पिता मृत झाला असेल, त्या दिवशी या पक्षात सर्व पितरांच्या उद्देशाने महालय श्राद्ध करण्याचा परिपाठ आहे. योग्य तिथीवरही महालय श्राद्ध करणे अशक्य झाल्यास पुढे 'यावद्वृश्चिकदर्शनम्' म्हणजे सूर्य वृश्चिक राशीला जाईपर्यंत ते कोणत्याही योग्य तिथीला केले, तरी चालते.

पितृपक्षात दत्ताचा नामजप करण्याचे महत्त्व : दत्ताच्या नामजपाने पूर्वजांना गती मिळण्यास आणि त्यांच्या त्रासांपासून रक्षण होण्यास साहाय्य होत असल्याने पितृपक्षात प्रतिदिन दत्ताचा जास्तीत जास्त नामजप करावा. या काळात प्रतिदिन न्यूनतम ७२ माळा नामजप करण्याचा प्रयत्न करावा.

श्राद्ध कोणी करावे ?

स्वतः करणे महत्त्वाचे - श्राद्धविधी स्वतः करायचा असतो. तो स्वतःला करता येत नाही; म्हणून आपण ब्राह्मणाकडून करवतो. आता श्राद्ध करणारे ब्राह्मणही मिळेनासे झाले आहेत. यावर उपाय म्हणून श्राद्ध-संकल्पविधीच्या पोथ्या मिळतात. त्या आणून प्रत्येकाने श्राद्ध-संकल्पविधी पाठ करावा. हा पाठ संस्कृत भाषेत असतो. आपण अन्य भाषा शिकतो, मग संस्कृत तर देवभाषा आहे. तसेच ती आपल्याला सहज येण्यासारखीही आहे. (वरील सूत्र तत्त्वतः योग्य असले, तरी संस्कृत भाषेतील उच्चारांतील काठीण्य, शास्त्रात सांगितलेला विधी नीट आकलन होण्याची मर्यादा इत्यादी पहाता स्वतः श्राद्धविधी यथासांग पार पाडणे, हे प्रत्येकाला शक्य होईल, असे नाही. अशांनी ब्राह्मणाकरवी आणि ब्राह्मण न मिळाल्यास एखाद्या जाणकाराकरवी श्राद्धविधी करण्यास आडकाठी नाही. श्राद्धविधी होणे, हे अधिक आवश्यक आहे, हे येथे लक्षात घ्यावे.)

श्राद्धविधी अमुक एक व्यक्ती करू शकत नाही ; म्हणून केला नाही, असे कोणालाही म्हणायला 'संधी न देणारा हिंदु धर्म ! - मुलगा (उपनयन न झालेलाही), मुलगी, नातू, पणतू, पत्नी, संपत्तीत वाटेकरी असणार्या मुलीचा मुलगा, सख्खा भाऊ, पुतण्या, चुलत भावाचा मुलगा, वडील, आई, सून, थोरल्या आणि धाकट्या बहिणीची मुले, मामा, सपिंड (सात पिढ्यांपर्यंतचे कुळातील कोणीही), समानोदक (सात पिढ्यांनंतरचे गोत्रातील कोणीही), शिष्य, उपाध्याय, मित्र, जावई या क्रमाने पहिला नसेल, तर दुसर्याने श्राद्ध करावे. एकत्र कुटुंबात कर्त्या वडील पुरुषाने (कुटुंबात वयाने मोठ्या किंवा सर्वांच्या पालनपोषणाचे उत्तरदायित्व असलेल्या व्यक्तीने) श्राद्धे करावीत. विभक्त झाल्यावर प्रत्येकाने स्वतंत्र श्राद्धे करावीत.' प्रत्येक मृत व्यक्तीसाठी श्राद्ध केले जाईल आणि त्याला सद्गती मिळेल, अशी पद्धत हिंदु धर्माने सिद्ध केली आहे. 'एखाद्या मृत व्यक्तीचे कोणीही नसल्यास त्याचे श्राद्ध करण्याचे कर्तव्य राजाचे असते', असे धर्मसिंधु या ग्रंथात नमूद करण्यात आले आहे. या लेखाच्या अभ्यासाने आपल्या महान ऋषीमुनींनी दिलेला 'श्राद्ध'रूपी अनमोल संस्कृतीधनाचा वारसा जपण्याची सद्बुद्धी सर्वांना लाभो, तसेच श्राद्धविधी श्रद्धेने करता येऊन आपल्या पूर्वजांची, तसेच स्वतःचीही उन्नती साधता येवो, ही श्री ईश्वरचरणी प्रार्थना.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'श्राद्ध' आणि 'श्राद्धातील कृतींमागील शास्त्र' संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे,**
**सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**

# धाकलगांवात गणरायाला ढोल ताशांच्या गजरात निरोप



**धाकलगांव । प्रतिनिधी -** अंबड तालुक्यातील धाकलगांव गावात विविध गणेश मंडळांच्या संयुक्त उत्साहात श्री गणेश बाप्पाचे विसर्जन आनंदमय वातावरणात पार पडले. डिजेला बंदी असूनही, ढोल-ताश्यांच्या गजरात, फटाक्यांच्या आतिषबाजीत आणि लेझीमच्या तालावर मिरवणूक काढून ग्रामस्थांनी गणरायाला भक्तिपूर्ण निरोप दिला.

श्रीराजे गणेश मंडळाने टाळ-मृदंगाच्या गजरात गणरायाला निरोप दिला. विशेष म्हणजे या सोहळ्यात मोठ्या संख्येने महिलांनीही उत्साहाने सहभाग नोंदवला. अंभग,गणपती जय घोष करित सर्व गावात मिरवणूक काढण्यात आली. तसेच तानाजी गणेश मंडळाचे पारंपारिक वाद्य हलगी पथकांने गावकऱ्यांचे लक्ष आकर्षित केले.

हे पंधरा जणाच बीडच पथक होते या मंडळाने सकाळी मिरवणूक काढल्याम ुळे सर्व गावातील युवकांनी सहभाग नोंदवला.तरुण गणेश मंडळ, साई गणेश मंडळ, सावता गणेश मंडळ एकत्र येऊन युवकांनी लेझीम खेळत भव्य मिरवणूक काढली. जय बजरंग गणेश मंडळ, दत्त नगर गणेश मंडळ तसेच इतर मंडळातील मोठ्या संख्येने युवकांनी उत्साहाने गणपती बाप्पांचे विसर्जन केले.

# सरकारसोबत आधीच ड्राफ्ट ठरवून समाजाची फसवणूक; आंदोलनात नाटकीपणा, कायदेशीर भक्कम आधार नाही

## डॉ. लाखे पाटील यांचा जरांगेंवर हल्ला

**जालना । प्रतिनिधी -** मराठा आरक्षण आंदोलनाला नवे वळण मिळाले असून या आंदोलनातील प्रमुख नेते मनोज जरांगे यांच्यावर आता समाजातीलच काही अभ्यासक व समन्वयक सडकून टीका करत आहेत. त्यामध्ये डॉ. संजय लाखे पाटील यांनी जरांगे यांच्या आंदोलनशैली, राजकीय भूमिकांपासून ते त्यांच्या नेतृत्वावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

डॉ. लाखे पाटील यांच्या मते, मनोज जरांगे यांचे आंदोलन हे समाजहितासाठी नसून स्वतःचे महत्त्व वाढवण्यासाठी आहे. मराठा आरक्षणाचा जगन्नाथाचा रथ मी एकटाच ओढतो अशी जरांगेंची मानसिकता आहे, असा आरोप त्यांनी केला.

चुकीच्या पद्धतीने आंदोलन चालवल्यामुळे मराठा समाजाचे प्रचंड नुकसान होत आहे, असे त्यांचे म्हणणे.

जरांगे हे मराठा समाजाचे नव्हे तर कुणबी समाजाचे नेतृत्व करतात, असा दावा लाखे पाटील यांनी केला.

जरांगेंच्या एकाही मागण्या वैध, कायदेशीर आणि घटनात्मक चौकटीत बसत नाहीत, त्यामुळे आरक्षणाचा खरा मार्गच चुकतो, असा त्यांचा इशारा.

शासन आदेश आणि कायदेशीर पुरावा यातला फरक जरांगेंना उमगत नाही; हैदराबाद गॅझेटचा त्यांना अभ्यास नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.



समाजाने जरांगे यांच्या आंदोलनात केवळ फुलांवर १०० कोटी रुपये उधळले, परंतु त्यातून काही ठोस निष्पन्न झाले नाही. जरांगे स्वतः कॅमेऱ्यासमोर येणे टाळतात, मात्र आंदोलनातून बुवाबाजी सुरू असल्याचा आरोप.

मुंबई आंदोलनादरम्यान सरकारचा ड्राफ्ट आधीपासून माहीत असूनही, तो वाचून सरकारचा जयजयकार व गुलाल उधळणे ही फसवणूक होती, असा दावा त्यांनी केला आहे. अगोदरच सरकारसोबत ड्राफ्ट तयार करून नंतर अभ्यासकांशी चर्चा करण्याचे नाटक केले जाते, असे ते म्हणाले.

जरांगेंचे आंदोलन टिकवले गेले नाही, तर देवेंद्र फडणवीस तीन महिनेही मुख्यमंत्री राहू शकणार नाहीत, असा दावा लाखे पाटील यांनी केला.

यामागचा खरा हेतू म्हणजे फडणवीसांना राजकीय पाठबळ देणे आणि समाजातील इतर नेत्यांना कमकुवत करणे. नूरा कुस्तीचे उपोषण सामने भरवून जरांगे स्वतःला तारणहार म्हणून मांडतात, तर इतर मराठा नेतृत्वाला बाजूला सारत असल्याची टिका डॉ. लाखे यांनी केली.

जरांगे यांचे आंदोलन हे आरएसएसच्या देशव्यापी अजेंड्यानुसार चालत असून, त्यातून मराठा समाजाला इतर समाजांपासून वेगळे करण्याचे काम होते आहे.

त्यामुळे मराठा समाज अधिक एकाकी होत असून, सामाजिक ऐक्य धोक्यात येऊ शकते, असा इशारा त्यांनी दिला.

जरांगे यांची एकही मागणी घटनात्मक कायदेशीर किंवा वैध नसल्याचे देखील त्यांनी म्हटलंय. हैदराबाद गॅझेट कसे लागू होऊ शकते याबाबत त्याचा अभ्यास बालवाडी इयत्ता एव्हढाच आहे!

शेवटी, डॉ. लाखे पाटील यांनी ठामपणे सांगितले की मराठा समाजाची राधाकृष्ण विखे पाटलांनी बेईमानी केली आहे. त्यांनी तातडीने माफी मागावी. डॉ. संजय लाखे पाटील यांनी केलेल्या या सडकून टीकेमुळे मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या पद्धतीवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. त्यांनी मांडलेल्या आरोपांनुसार, हे आंदोलन समाजहितासाठी नसून राजकीय अजेंडा, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि बुवाबाजी यावर आधारलेले आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचा खरा मार्ग धूसर होऊन समाजाचेच मोठे नुकसान होत असल्याचा इशारा दिला गेला आहे.

# 'त्या व्हायरल व्हिडीओतील' आरोपी अटकेत; जालना पोलीसांकडून तातडीने कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील सदर बाजार पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात गायीची कत्तल करून तिचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याच्या प्रकरणी तिघा संशयितांना पोलिसांनी अटक केली आहे. हिंदुत्ववादी संघटनांच्या आक्रमक धोरणामुळे पोलीसांनी तातडीने ही कारवाई केली आहे. विसर्जन मिरवणुक होणार नसल्याचा पावित्रा हिंदुत्ववादी संघटनांनी घेतला होता. त्यानंतर पोलीसांनी तपासाची चक्रे फिरवत संशयितांना ताब्यात घेतले आहे.

दि. ०१ सप्टेंबर २०२५ रोजी एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यामध्ये तिघे इसम गायीची क्रूरतेने कत्तल करत असल्याचे दिसून आले. या प्रकरणी जनतेत संताप उसळला होता. व्हिडिओचा तपास केल्यानंतर सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला गुन्हा क्रमांक ७४५/२०२५ भादंवि कलम २९९, ३(५), प्राण्यांवरील क्रूरतेचा कायदा कलम ५(क), ९, ९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला होता.

या प्रकरणी संशयित असलम कुरेशी आणि त्याचे दोन सहकारी अशा तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले

सदर बाजार पोलीस ठाण्याचे निरीक्षक यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोशल मीडियावर अशा प्रकारचे व्हिडिओ टाकून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. कोणताही समाज असो, अशा कृती सहन केल्या जाणार नाहीत. कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल.

याशिवाय या घटनेशी संबंधित आणखी कोण सहभागी आहेत का, याचा तपास सुरु आहे. या घटनेनंतर शहरात तणावाचे वातावरण निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त ठेवला आहे. समाजातील नेत्यांनी शांततेचे आवाहन केले असून, धार्मिक भावना भडकावणाऱ्या कृत्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. गायीची कत्तल करून त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केल्याने शहरात खळबळ उडाली होती. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपींना अटक केली असून पुढील तपास सुरु आहे.

ही कारवाई पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि संदीप भारती, पंकज जाधव, यांच्या नेतृत्त्वात सपोनि उबाळे, पोउपनि शैलेश म्हस्के, सचिन सानप, संजय गवई, जगन्नाथ जाधव, धनाजी कावळे, सुभाष पवार, शिवहरी डिघोळे, बाबा हरणे, नजीर पटेल आदींच्या पथकाने केली आहे.

# भाजपाची बदनापूर-अंबड स्थानिक स्वराज्य रणधुमाळीसाठी निरीक्षकांची नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षाने बदनापूर आणि अंबड तालुक्यात निरीक्षक व प्रभारींची नियुक्ती केली आहे. भाजपाचे बदनापूर तालुकाध्यक्ष भगवान मात्रे, अंबड तालुकाध्यक्ष प्रदीप पवार आणि अंबड शहराध्यक्ष सौरभ कुलकर्णी यांनी जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे आणि जिल्हा संघटन सरचिटणीस अनिलराव कोलते यांच्या मान्यतेनुसार या नियुक्त्या जाहीर केल्या.

बदनापूर आणि अंबड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या गटांसाठी स्वतंत्र प्रभारी आणि निरीक्षक निश्चित करण्यात आले आहेत. **गेवराई बाजार गट:** प्रभारी हरीचंद्र बाबा शिंदे, निरीक्षक जगन्नाथ बारगाजे **रोषणगाव गट:** प्रभारी अनिल कोलते, निरीक्षक युनूस गुड्डु व समीर शेख **सेलगाव गट:** प्रभारी कल्याण काळे व भास्कर घनघाव, निरीक्षक पदमाकर जऱ्हाड **बावणे पांगरी गट:** प्रभारी भगवान बारगाजे, निरीक्षक बाबासाहेब कऱ्हाळे **दाभाडी गट:** प्रभारी राम पाटील, निरीक्षक गोरख खैरे **पारनेर गट:** प्रभारी पंजाब भाऊ सोळुंके व पांडुरंग शिंदे, निरीक्षक ओम उबाळे **रोहीलागड गट:** प्रभारी साईनाथ उकिर्डे, निरीक्षक गंगाधर वराडे **जामखेड गट:** प्रभारी श्रीराम नागरे, निरीक्षक सौरभ कुलकर्णी **ताडहादगाव गट:** प्रभारी सचिन जाधव, निरीक्षक केदार कुलकर्णी **साष्ट पिंपळगाव गट:** प्रभारी शंकर लहामंगे, निरीक्षक रमेश बुंदेलखंडे

तालुक्यातील पंचायत समितीच्या १९ गटांसाठी वेगवेगळ्या कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. यात **गेवराई बाजार गण:** प्रभारी सत्यानारायण गेल्डा **निकळक गण:** प्रभारी मुज्जमिल सय्यद **रोषणगाव गण:** प्रभारी परमेश्वर डाके व पप्पू कुलकर्णी **वाकुळणी गण:** प्रभारी संदीप पवार व विनोद साबळे **सेलगाव गण:** प्रभारी प्रदीप साबळे **काजळा गण:** प्रभारी गोरख रसाळ व शरद गिते **बावणे पांगरी गण:** प्रभारी समाधान मुंडे **तुपेवाडी गण:** प्रभारी भिमराव जावळे **दाभाडी गण:** प्रभारी मुश्ताक शेख **भाकरवाडी गण:** प्रभारी विलास जऱ्हाड **पारनेर गण:** प्रभारी संदीप खरात **दहीपुरी गण:** प्रभारी बाबुराव खरात व दीपक पांढरे **रोहीलागड गण:** प्रभारी शाहुल (बाळु) खरात **हस्तपोखरी गण:** प्रभारी दीपक लोहकरे **जामखेड गण:** प्रभारी बाळासाहेब तायडे व शेख फेरोज **चिंचखेड गण:** प्रभारी नंदकिशोर पाटील **ताडहादगाव गण:** प्रभारी काकासाहेब कटारे व सुनिल बिडे **सोनक पिंपळगाव गण:** प्रभारी सुरेश गुडे व भगवान भोजणे **दुनगाव गण:** प्रभारी अनंत हुसे अंबड नगर परिषदेकरिता प्रभारी व निरीक्षकांची स्वतंत्र टीम जाहीर करण्यात आली आहे. यात **नगर परिषद प्रभारी:** अवधुत नाना खडके, **सह प्रभारी:** देविदास कुचे **निरीक्षक:** भगवान मात्रे अंबड नगर परिषद प्रभागनिहाय नियुक्त्या अकरा प्रभागांमध्ये निरीक्षक व सह निरीक्षक निश्चित करण्यात आले आहेत. यात **प्रभाग क्र. १:** निरीक्षक प्रदीप पवार, सह निरीक्षक प्रल्हाद उगले **प्रभाग क्र. २:** निरीक्षक साईनाथ उकिर्डे व संजय जाधव, सह निरीक्षक सुनिल खांडेकर व संकेत खरात **प्रभाग क्र. ३:** निरीक्षक डॉ. राहुल डोंगरे, सह निरीक्षक शिवाजी सानप **प्रभाग क्र. ४:** निरीक्षक धनंजय चावरे, सह प्रभारी काशिनाथ खांडेभराड **प्रभाग क्र. ५:** निरीक्षक जितेंद्र पालकर व पांडुरंग शिंदे, सह निरीक्षक सुगंध संचेती **प्रभाग क्र. ६:** निरीक्षक डॉ. नंदकिशोर पिंगळे, सह निरीक्षक अकबर पठाण **प्रभाग क्र. ७:** निरीक्षक नवाज पटेल, सह निरीक्षक इरफान पटेल **प्रभाग क्र. ८:** निरीक्षक श्रीराम नागरे, सह निरीक्षक अरुण जळके **प्रभाग क्र. ९:** निरीक्षक डॉ. रामकिशन जाधव, सह निरीक्षक फैसल कुरेशी **प्रभाग क्र. १०:** निरीक्षक बळीराम वैद्य, सह निरीक्षक ज्ञानदेव मगरे **प्रभाग क्र. ११:** निरीक्षक राम गाडेकर, सह निरीक्षक भिमसिंग बम्हाणावत आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपाने बदनापूर आणि अंबड तालुक्यांत सविस्तर पातळीवर जबाबदाऱ्या वाटप केल्या आहेत. गटनिहाय, प्रभागनिहाय प्रभारी आणि निरीक्षकांची जाहीर यादी संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वाची ठरणार आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रणधुमाळीसाठी भाजपाने सज्जतेचा बिगुल वाजविला असल्याचे चित्र दिसत आहे.

# जगद्गुरु नरेंद्राचार्य यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराची मागणी; भक्तगनाचे आमदार बबनराव लोणीकर यांना निवेदन

## भक्तगणाची मागणी मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचविणार- आमदार लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर विधानसभा मतदारसंघाचे माजी मंत्री आणि लोकप्रिय आमदार श्री. बबनराव लोणीकर यांना एक निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनात जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य, रामानंदाचार्य दक्षिणपीठ, नाणीजधाम यांना त्यांच्या सामाजिक आणि धार्मिक कार्यासाठी 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्याची मागणी करण्यात आली आहे. हे निवेदन शिवदास हनवते, सोमनाथ सोनवणे, भगवानराव सरकटे, केशवराव येऊन, किशोर हनवते, अंबादास फुपाटे, धोंडीराम फुकाटे, भगवान राठोड, शत्रगुण जाधव, राजेश पवार, महादेव काळे, प्रवीण गारकर आणि सुनील ठोंबरे यांनी संयुक्तपणे सादर केले.

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य हे वैष्णव पंथाचे प्रमुख आचार्य असून, त्यांनी हिंदू धर्माचे संवर्धन, समाजसुधारणा आणि समाजसेवेत मोलाचे योगदान दिले आहे. २०११ पासून 'ब्लड-इन-नीड' योजनेत हजारो युवक-युवतींनी २५,००० हून अधिक गरजूंना विनामूल्य रक्त पुरवले. ४ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत १,३६,२७२ रक्त बाटल्या संकलित झाल्या. वेदांचे शिक्षण देऊन ४५० पुरोहित तयार केले असून, मुलींनाही पुरोहित प्रशिक्षण देण्याचे कार्य सुरू आहे. २००९ पासून विनामूल्य इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालवून गोरगरीब मुलांना शिक्षण देत १००% निकालाची परंपरा कायम आहे. २०१० पासून ५३ ॲम्बुलन्सद्वारे २७,००० हून अधिक अपघातग्रस्तांचे प्राण वाचवले गेले. ५६,५३७ लोकांनी देहदानाचे अर्ज भरले, १३५ व्यक्तींचे देहदान आणि ५५ अवयवदान झाले. २०१४ पासून ७०० हून अधिक आदिवासी युवकांना मोटर ड्रायव्हिंग प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनवले. १,५२,००० कुटुंबांची घरवापसी, १५,४०० कुटुंबांचे विवाह संस्कार आणि ४-५ लाख युवकांना व्यसनमुक्तीचे कार्य केले. २०२३ पासून वृक्षलागवड, पाणी अडवा-पाणी जिरवा आणि नेट झिरो कार्यक्रम राबवले जात आहेत. महापूर, भूकंप, आग आणि कोरोनासारख्या संकटांमध्ये अन्न, औषधे, कपडे आणि कोट्यवधी रुपयांची आर्थिक मदत पुरवली. या कार्यांमुळे त्यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्याची मागणी लाखो अनुयायांनी केली आहे. निवेदनकर्त्यांनी श्री. बबनराव लोणीकर यांच्याकडे सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.



# हैदराबाद मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरात राज्य मंत्रिमंडळाची बैठक घ्यावी

## डॉ. संजय लाखे पाटील यांची आग्रही मागणी

**जालना । प्रतिनिधी-** मराठवाडा अनुशेष निर्मूलन आणि विकास मंचचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याच्या मुख्य सचिवांना निवेदन पाठवून १६ व १७ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे राज्य मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करावी, अशी मागणी केली आहे. हैदराबाद मुक्ती संग्राम दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ही बैठक होणे गरजेचे असून, मराठवाड्याच्या प्रलंबित प्रश्नांवर तातडीने निर्णय व्हावेत, असे त्यांनी स्पष्ट केले.



डॉ. लाखे पाटील म्हणाले की, विदर्भ महाराष्ट्रात नागपूर करारान्वये सामील झाला व त्यानुसार दरवर्षी नागपूर येथे हिवाळी अधिवेशन घेण्याची तरतूद आहे. मात्र, मराठवाड्याच्या नेतृत्वाने कोणताही करार न करता राज्यात प्रवेश केला. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी अन्याय होणार नाही अशी ग्वाही दिली होती. पण पुढील काळात ही बांधिलकी पाळली गेली नाही. परिणामी, मराठवाडा सतत विकासाच्या संधींपासून वंचित राहिला. हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथे मंत्रिमंडळ बैठका घेण्याची परंपरा होती, पण ती गेली कित्येक वर्षे थांबली आहे. २०१६ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात झालेल्या बैठकीत रु ४९,०२० कोटींच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली होती. अमृतमहोत्सवी वर्षात रु ४२,०२० कोटींच्या प्रकल्पांची घोषणा झाली, पण त्यांची पूर्ण अंमलबजावणी झालेली नाही.

डॉ. लाखे पाटील यांनी पुढील मागण्या केल्या सप्टेंबर २०२५ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे राज्य मंत्रिमंडळाची बैठक घेणे., २०१६ व अमृतमहोत्सवी वर्षातील प्रकल्पांना तत्काळ निधी उपलब्ध करून पूर्णत्वास नेणे., गेल्या दहा वर्षांत (२०१४-२०२४) राज्यातील तिन्ही वैधानिक विभागांना (विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र) मिळालेल्या निधी, मंजुरी व प्रकल्पांची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करणे. जर मंत्रिमंडळाची बैठक आयोजित झाली नाही तर, १७ सप्टेंबर रोजी जालना व इतर ठिकाणी हुतात्मा स्मारकासमोर लाक्षणिक उपोषण केले जाईल. यासाठी मराठवाड्यातील सामाजिक, विकासाभिमुख संघटना आणि राजकीय पक्षांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

स्थानिक आमदार अर्जुनराव खोतकर यांनी यासाठी पुढाकार घ्यावा, अशीही त्यांनी विनंती केली. मराठवाड्याचा विकास अनुशेष मिटवण्यासाठी आणि ऐतिहासिक अन्याय दुरुस्त करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरात मंत्रिमंडळाची बैठक घेणे अत्यावश्यक असल्याचे डॉ. संजय लाखे पाटील यांनी अधोरेखित केले. ही बैठक झाली नाही तर आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## जालना गणेश फेस्टिव्हलमध्ये लोकसंगीताचे दान व माय मराठीचे गुणगान

# ‘फोल्क लोक’च्या सादरीकरणामुळे जालनेकर मंत्रमुग्ध





**जालना । प्रतिनिधी -** ‘फोल्क लोक’ ने गण, अभंग, पोवाडा, भारुड, गोंधळ गीत, लावणी सादर करत जालना गणेश फेस्टिव्हलमध्ये नवीन पिढीला विसर पडत चाललेल्या लोकसंगीताचे दान देत माय मराठीचे गुणगानही केले.

शुक्रवारी महाराष्ट्रभर गाजत असलेल्या 'फोल्क लोक' या लोकगिताच्या कार्यक्रमाने रौप्य महोत्सवी वर्षातील जालना गणेश फेस्टिव्हलची सांगता झाली. शौनक कुलकर्णी यांनी सादर केलेल्या' अंबिका माय' या घाटोळीला रसिकांनी दाद दिली. ही घाटोळी वन्स मोअर झाली. ईश्वरी बाविस्कर हिने सादर केलेल्या 'सात समुदर आटले गं बाई आईच्या आंघोळीला' हे लोकगीत महिला रसिकांची दाद घेऊन गेले. 'गण बाई मोगरा' हे भारुडही रसिकांची दाद घेऊन गेले. सुबोध कोटेकर याने सादर केलेले ' पिवळा रंग पाहूनिया दंग झालो मल्हार' हा अंभग रसिकांना मंत्रमुग्ध करून गेला. ईश्वरी बाविस्कर हिने ' गार डोंगराची हवा' हे भारुड तसेच ' गजर हरी नामाचा' हा अभंग सादर केला. शौनक कुलकर्णी व सुबोध कोटेकर यांनी सादर केलेले ' पड रं पाण्या, पड रं पाण्या भिजवी जमीन, शेत माझं लयी तान्हेलं चातकावानी' हे शेतकरी गीत रसिकांची दाद घेऊन गेले. पृथा केंगारे यांनी ' तुझ्या ऊसाला लागल कोल्हा व कुणा कुणाला वाटे वाईट वर्तन' या लावणीवर केलेल्या नृत्यावर रसिकांनी ठेका धरला. या कार्यक्रमात' फोल्क लोक'ने महाराष्ट्रातील पारंपरिक लोकगीतेही सादर केली. शौनक कुलकर्णी, सुबोध कोटेकर, मुकुल शिगांडे , ईश्वरी बाविस्कर, हृषाली कालेकर यांनी लोकगीते सादर केली. त्यांना सई जोशी व सौरभ यांनी साथ दिली. ओमकार जोशी, सक्षम जाधव, मुकुंद कोंडे, कौस्तुभ सोनवणे यांनीही तालवादक म्हणून लोकगितांना साथ दिली. तसेच सई जोशी, सिध्दांत कांबळे, भशंतनू डिघे यांनी सुरवादक म्हणून साथ दिली. सिध्दांत उमरीकर यांच्या बासरीवादनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. शिवकुमार गायकवाड, धनंजय डिघे यांची बतावनीही लक्षवेधी ठरली.

प्रारंभी श्रीमती सरलाताई वाढेकर यांच्या हस्ते श्रीफळ फोडून गणेश फेस्टिव्हलच्या समारोपीय कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी सौ. विमलताई आगलावे, उज्वलाताई घोगरे आदींची उपस्थिती होती.

जालना गणेश फेस्टिव्हलच्या वतीने संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे पाटील, अध्यक्ष अशोकराव आगलावे, कार्याध्यक्ष भाऊसाहेब घुगे, कोषाध्यक्ष रवींद्र हुसे, संस्थापक सदस्य राजेंद्र राख, दिनेश फलके आदींनी आमदार अर्जुनराव खोतकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, माजी नगराध्यक्ष संगिताताई गोरंट्याल,भाजपचे महा नगराध्यक्ष भास्कर दानवे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनित सहानी, विजय दाड, सौ. सीमाताई खोतकर, सौ . सुशिलाताई दानवे, युवा सेनेचे प्रदेश सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णु पाचफुले, सहाय्यक पोलीस निरीक्षक आरती जाधव तसेच 'फोल्क लोक'च्या कलावंताचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार खोतकर,माजी आमदार गोरंट्याल दानवे आदींनी आपल्या मनोगतात जालना गणेश फेस्टिव्हलच्या संयोजन समितीचे कौतुक करून जालना गणेश फेस्टिव्हल हा जालना शहरातील सांस्कृतिक चळवळीला गती देणारा ठरला असल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष कोळकर व सुरेश मुळे यांनी केले.

यावेळी ॲड. सोपानराव भांदरगे, अरूण भोरे, डॉ. रावसाहेब ढवळे, राजेंद्र गोरे, शरद देशमुख, अशोक उबाळे, चंद्रशेखर वाळिंबे, किरण गरड, ज्ञानेश्वर कदम, प्रा. राजेंद्र भोसले , अजिंक्य घोगरे, प्रसाद वाढेकर, धनराज काबलिये, अविनाश भंडे, रोहित देशमुख, उदय देशमुख,संजय देशमुख , मेघराज चौधरी , ॲड. शैलेश देशमुख , गणेश कावळे, संगिताताई राख, भारतीताई वाळिंबे, रोहिणीताई कोळकर, सुषमाताई खरात, गंगा काळे, रितूल घोगरे, सविताताई चिन्नदोरे यांच्यासह नागरिक व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## छत्रपती संभाजी महाराज उद्यानातील साफसफाई व खेळणी दुरुस्तीसाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे निर्देश



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील छत्रपती संभाजी महाराज उद्यानाची तपासणी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी शनिवार, दि. ६ सप्टेंबर २०२५ रोजी केली. या तपासणीदरम्यान उद्यानातील मोडलेल्या अवस्थेतील खेळणी व अस्वच्छ परिसर पाहून त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तपासणीवेळी जिल्हाधिकारी मित्तल यांनी सांगितले की उद्यानातील खेळणी मोडकळीस आलेली आहेत., परिसरात अपेक्षित पातळीची स्वच्छता नाही., वृक्षसंवर्धन आणि बागेच्या सौंदर्याबाबतही दुर्लक्ष झालेले आहे. यावरून त्यांनी महानगर पालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना फटकारले. १५ दिवसांच्या आत उद्यानातील सर्व खेळणी दुरुस्त करावीत, नियमितपणे साफसफाई व वृक्षसंवर्धन करावे. उद्यानात येणाऱ्या नागरिकांना सुरक्षित व स्वच्छ वातावरण मिळेल याची काळजी घ्यावी. असे निर्देश त्यांनी दिले. जालना शहरातील नागरिक हे उद्यान फिरायला, मुलांना खेळण्यासाठी आणि कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी वापरतात. पण उद्यानाची जीर्ण अवस्था व अस्वच्छता यामुळे नागरिक नाराज होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या या हस्तक्षेपामुळे आता सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.